# श्रीयुत शेट फिरोजशहा होर्मसजी यांच्या अनुभवावर सुचलेले विचार.

कृ. शि. सा; न. वि. वि.

मुंबापुरस्थ पारशी शेट श्रीयुत फिरोजशहा होर्मसजी पदमजी यांनीं सन १९१७ सालीं म्हणजे १४ वर्षांपूर्वी विश्वांतर साक्षी श्री साईबाबा संबंधानें त्यांना जो प्रत्यक्ष अनुभव आला, व जो त्यांनीं ता. १५-३-३१ रोजीं सांताक्रुसनिवासी रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांना मुद्दाम त्यांच्या घरीं येऊन सांगितला व,जो आपण श्रीसाईलीला मासिकाच्या ८ व्या वर्षाच्या १-२ या जोड अंकांत नुकताच प्रसिद्ध केला, त्यासंबंधानें सुचलेले विचार खाली देत आहे.

फिरोजशहा शेटचे वडील बाबांचें दर्शन घेऊन बाबांचा फोटो बरोबर घेऊन शिरडीहून परत मुंबईस आले. फिरोजशहा त्या वेळीं विद्यार्थी होते व ते म्हणाले, असे साधु पुष्कळ असतात, त्यांत खरेंखोटें कसें ओळखावे ! बाबांनीं त्याच रात्रीं दृष्टांत देऊन फिरोजशहास सांगितलें कीं, तुझ्या वडिलांनीं टेबलावर ठेविलेला माझा फोटो तूं सकाळीं उचलून पाहा. तूं उचलूं शकलास तर मी खोटा साधु व उचलूं न शकलास तर मी खरा संत.

बाबांचा फोटो तो कितीसा मोठा असणार ? पण तो फिरोजशहा शेट आपलें सामर्थ्य सर्वस्व खर्च करूनही उचलूं शकले नाहींत. फोटो टेबलावर ठेविला होता. फोटोसह सर्व टेबल उचललें गेलें, परंतु टेबलावरील सुटा फोटो स्वतंत्र व अलग रीतीनें उचलला गेला नाहीं. काय ही अद्भुत लीला व प्रचंड सत्ता ! !

वैदिक वाङ्मयाच्या तृतीय म्हणजे ज्ञानकांडांत अशीच एक सुंदर आख्यायिका आलेली आहे. तिचें स्मरण झाल्यावरून ती संस्कृत आख्यायिका व तिचा मराठी सारांश खालीं देत आहे.

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयंत, त ऐक्षन्ता स्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥ १४ ॥ तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥ १५ ॥ तेऽग्निमब्रुव-ञ्जातवेद एतद्विजानीहि किमेतद्यक्ष मिति तथेति ॥ १६ ॥ तदभ्यद्रवत्तम भ्यवदत्को सीत्यग्निर्वा अहमस्मीत्य ब्रवीज्जातवेदा वा अहमस्मीति ॥१७॥ तस्मि न्स्त्वयि किं वीर्य मि त्यपी दन्ँ सर्वं दहेयं यदिद पृथिव्यामिति॥१८॥ तस्मै तृणं निदधावेतद्दहेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं सतत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ १९ ॥ अथ वायुमब्रुवन्वायवेतद्विजानीहि किमेद्यक्षमिति तथेति ॥ २० ॥ तदभ्यद्रवत्तमभ्यवदत्कोऽसीति वायुर्वा अहमस्मी-त्यब्रवीन्मातरिश्वा वा अहमस्मीति ॥ २१ ॥ तस्मिन् स्त्वयिकिं वीर्यमित्यपीदँ सर्व माददीय यदिदं पृथिव्यामिति ॥ २२ ॥ तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति तदुपप्रेयाय सर्व जवेन तन्न शशाकाऽऽदातुं सतत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥२३॥ अथेंद्रमब्रुवन्मघवन्नेतद्विजानी हि किमेतद्यक्षमिनि तथेति तदभ्यद्रवत्त स्मात्तिरोदधे ॥ २४ ॥ सतस्मिन्नेवाऽऽकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमाँ हैमवतीं ताँ होवाच किमेतद्यक्षमिति ॥ २५ ॥ सा ब्रम्हेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति ततो हैव विदांचकार ब्रम्हेति ॥ २६ ॥

## मराठी सारांश.

पूर्वी देवदानव युद्धामध्यें जग स्थितिपरिपालनेच्छेनें परमात्माज्ञानुसार वर्तन करणाऱ्या लाभार्थी देवांनीं स्वलाभार्थ असुरांचा पराभव केला, व पर-मात्म सत्तेनेंच त्यांना जय मिळाला. परमात्म्या वस्तूच्या अस्तित्वाबद्दल, सत्यते-बद्दल, ऐश्वर्याबद्दल व अंतर्साक्षित्वाबद्दल भयंकर अज्ञान असल्यामुळें, हा जो जय मिळाला हा आमच्याच सामर्थ्यानें मिळाला, असा मिथ्या अभिमान देवांना झाला व हा जो मोठेपणा आम्हांस मिळाला आहे तोही आमच्या अतुल सामर्थ्याचें फळ होय असें त्यांना वाटलें; परंतु परमात्मास ही गोष्ट कशी खप-णार ! देव अज्ञानांत बुडाले, स्वहितास मुकले, वृथाभिमानास बळी पडले असें

पडून त्यांचा अभिमान नष्ट करावा व त्यांचें कल्याण करावें या उदात्त हेतूनें, परमात्मा, एका अंतरालस्थ यक्षाचें स्वरूप धारण करून अंतरालांत अत्यंत तेजस्वी दैदिप्यमान सौदामिनी ( विद्युल्लता ) प्रमाणें चमकूं लागले.

ही बातमी हां हां म्हणतां सर्व स्वर्ग लोकांत पसरली व हें अद्भुत सत्व कोण आहे व याचा अवतार कशाकरितां आहे याचा उलडा कोणासच होईना. सर्व देव इंद्राकडे गेले व त्यांनीं ही बातमी इंद्राच्या कानावर घातली. अमर नृपति इंद्रानें त्या सत्वाचें ज्ञान करून घेण्याकरितां सर्व शक्तिमान व निमिषमात्रांत ब्रह्मांड दग्ध करून टाकणाऱ्या जातवेद अग्नीस तिकडे पाठविलें. तूं कोण आहेस म्हणून त्या सत्वानें त्यास विचारतां मी विश्वदग्ध करणारा आहें, अशा गर्वोक्तीचें उत्तर दिलें. परमात्मांनीं त्याच्या पुढें एक लहानशी गवताची काडी टाकिली व ही जाळ, अशी आज्ञा केली. आपला अपमान झाला असें अग्नीस वाटलें, पण त्या सत्वाची आज्ञा उल्लंघन करणें शक्य नव्हतें. शक्तीसर्वस्व खर्च करून काडी जाळण्याचा भगीरथ प्रयत्न अग्नीनें केला. पण काडी जाळूं शकला नाहीं. अग्नी हिरमुष्टी झाला व म्लानवदन करून त्यानें आपल्या पराजयाची हकीकत आपल्या अधिपतीस सांगितली. अमर भूपतीनें नंतर मातरिश्वा वायूस पाठविलें. परमात्मानें त्यास विचारलें तूं कोण, तो म्हणाला ! सर्व विश्वाला निमिषमात्रांत इकडून तिकडे फेकून देणारा मी प्रभंजन आहें. बरें तर ही येवढी गवताची काडी उचलून फेंकून दे, असे म्हणून त्याच्यापुढें अग्नीसमोर जाळण्याकरितां ठेविलेली तीच काडी ठेविली असें सांगण्यांत आपलाही अपमान झाला असें अग्नीप्रमाणें वायूसही वाटलें; पण करतो काय ? सत्वाज्ञा मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. वायूनेंही आपलें बल स्वसर्व खर्च करून व काडी उचलण्याचा प्रयत्न केला, पण तोही ती काडी उचलूं शकला नाहीं. वायू खजिल झाला व लज्जेनें मान खालीं घालून त्यानें अग्नीप्रमाणें आपलीही फजिती झाल्याचें वृत्त अमरनाथास निवेदन केलें. शेवटीं सर्व देवांच्या आग्रहपूर्वक विनंतीवरून स्वतः इंद्र गेले. इंद्र त्या ठिकाणीं जाऊन पोंचतांच तें सत्य अंतरधान पावलें. अग्नीस व वायूस

निदान त्या यक्षरूप सत्वाचें दर्शन होऊन त्याचें व त्याचें बोलणें झालें, मला तेंही घडलें नाहीं यामुळें आपला भयंकर अपमान होऊन आपण परम हतभागी आहों असें इंद्रास वाटलें. व तो अतीशय खिन्न झाला; परंतु ज्या आकाशांत तें सत्व अंतरधान पावलें त्याच आकाशांत त्याचें श्रद्धापूर्वक ध्यान करीत तो तसाच उभा राहिला. इंद्र गलिताभिमान झालेला पाहून व त्याची त्या यक्षसत्वावर भक्ति पाहून परमात्माची अखंड सहचारिणी हेमालंकारमंडिता, जगन्मोहिनी, रुचिर स्वरूपा, उमारूपिणी विद्या त्याच आकाशांत प्रादुर्भूत झाली. तिला इंद्रानें विचारलें कीं, हें निरोधान पावलेलें यक्षसत्व कोण ? ती म्हणाली, तें परब्रह्म. तुम्हां देवा-असुरांच्या युद्धांत तुम्हांस निमित्तमात्र करून ज्यांनीं विजय मिळविला तो हा परमात्मा. त्याचा विजय व मोठेपणा असतां तुम्हीं वृथाभिमानानें तो विजय व तो मोठेपणा तुमचा आहे असें समजतां. उमावचनानें इंद्रादि देवांची खात्री झाली कीं, आपला अभिमान मिथ्या आहे. ही सर्व सत्ता त्या निर्गुण अदृश्य परब्रह्माची आहे.

वरील आख्यायिक विश्ववंद्य वेदमाउलीच्या शिरोभागीं अमोल रत्ना-प्रमाणें प्रकाशमान होणाऱ्या दशोपनिषदांपैकीं केनोपनिषदांतील आहे. ( तृतीय खंड मंत्र १४ ते २६ )

ही आख्यायिका वरील फिराजशहा शेट यांच्या अनुभवास तंतोतंत जुळत आहे. यावरून उपनिषद कालींच परमात्मा आपले प्रचंड व अद्भुत ऐश्वर्य प्रगट करून देवादिकांचा अभिमान गलित करीत असून त्यांचें कल्याण करीत असत असें नव्हे, तर हल्लींही या युगांत व प्रस्तुत कालीं निर्गुण अदृश्य व अगोचर परमात्मा आपलें जिवंत अस्तित्व, अगम्य ऐश्वर्य अतर्क्य सामर्थ्य, अद्भुत सत्ता. अमर्याद व्याप्ति आपलाच सगुणावतार संतचुडामणी श्री बाबांच्या स्वरूपांत सिद्ध करून देऊन भक्ताच्या चिकित्सक बुद्धीस पटेल असा, अनुभव त्यास देऊन त्याचा अभिमान नष्ट करून त्याचें कल्याण करीत आहेत, ही चिरस्मरणीय व परमानंदनीय गोष्ट आहे.

फिरोजशहा शेट यांचा अनुभव आधिभौतिक चष्म्यानें प्रत्येक वस्तु पहाणाऱ्या आधुनिक, नास्तिक व वावदुक शिरोमणीसही परमात्म वस्तूच्या अस्तित्व सत्यतेबद्दल खात्री पटवून देण्यांत पुरेसा आहे. वेद अप्रमाण, स्मृती असत्य, पुराणें मिथ्या, शास्त्रें वृथा म्हणणाऱ्या विद्वान लोकांच्या डोळ्यांतही हा वरील अनुभव म्हणजे एकप्रकारचें झणझणीत अंजनच आहे. हल्लीं अंतरिक्षात जिकडे तिकडे विमानें फिरूं लागलीं, तेव्हां पूर्वीचे प्रभू रामचंद्र नृपतीकालचें पुष्पक विमान खरें, गेल्या फ्रान्स व जर्मनीच्या महायुद्धांत घातुक धुराचा उपयोग केला गेला तेव्हां पूर्वीचें धूम्रास्त्र खरें असें वाटूं लागलें. वरील फिरोजशहा शेटच्या अनुभवानें उपनिषद् कालच्या आख्यायिका खऱ्या आहेत अशी खात्री पटून त्या ग्रंथरत्नावर प्रेम जडून भक्तवृंद मिथ्याभिमानापासून मुक्त होऊन परमात्मतत्वीं लीन होतील, अशी त्या जगज्जनक संतविभूषण श्री बाबांच्या दिव्य चरण पुंडरिकीं उत्कट प्रेमभावानें प्रार्थना करून व तेथेंच हें वाक्सुमन साष्टांग प्रणामासह अर्पण करून सुचलेले विचार संपवितों.

मल्याण. मिती वैशाख कृष्ण १३ शके १८५३.

बाबांचें बाळ.

खातरीनें वाटे मशीं । जा म्यां तुला सोडिलें ॥ ११५ ॥ तें ऐकतां हुजूरवचन । आनंदलें आप्पाचें मन । शिरडीकडे तोंड करून । नाचूं लागला आनंदें ॥ ११६॥ हे सायी महाराज कल्पद्रुमा । भक्तजनांचे पूर्णकामा । वैराग्याच्या निवासधामा । केलीस कृपा माझेवरी ॥ ११७ ॥ तेणें मी झालों धन्य । या जगामाजीं जाण । अब्रूचें केलें रक्षण । माझ्या तुवां पुण्यवंता ॥ ११८ ॥ आप्पा तेथून दुसरे दिशीं । परत आला शिरडीसी । नमून सायीपदासी । वर्तमान श्रुत केलें ॥ ११९ ॥ बोलले बाबा त्यावर । करता करविता परमेश्वर । भक्तासाठीं शारङ्गधर । जें न घडे तें घडवीतसे ॥ १२० ॥ पुढें एके समयास । नारायण कृष्ण पेणशास । दाखविलें चमत्कारास । तें कथानक ऐका हो ॥ १२१ ॥ कांता तया पेणशाची । परम भाविक उदार मनाची । तिची इच्छा दर्शनाची । झाली असे बाबांच्या ॥ १२२ ॥ सती विनवी जोडून करा । हे मत्सौभाग्य भांडारा । हे मत्सौख्यनभींचे दिनकरा । माझी विनंति ऐका हे ॥ १२३ ॥ कर्णोपकर्णीं ऐकिली मात । शिरडी नामक ग्रामांत । बाबा सायी महा महंत । दर्शनायोग्य असती ॥ १२४ ॥ म्हणून वाटतें माझ्या मनीं । चला त्या गावां लागुनी । लीन होऊं संतचरणीं । आपण उभयतां प्राणेश्वरा ॥ १२५ ॥ पेणसे म्हणती त्यावरी । ऐक मद्वचना सुंदरी । शिरडी ग्रामा भीतरीं । कोणी न संत सुशीले ॥ १२६ ॥ तेथें एक मुसलमान । वेडापिसा आहे जाण । बळेंच ढोंग माजवून । जग लुटाया बैसला ॥ १२७ ॥ त्याचा मांडिला देव्हारा । या अज्ञ जनांनीं खरा । म्हणोन ऐके माझी गिरा । भलता हट्ट घेऊं नको ॥ १२८ ॥ जेथें मुळींच क्षारपण । तेथें मधुरता कोठून । बेगडाचें उत्तम सुवर्ण । होईल कां सांग कांते ॥ १२९ ॥ तूं न पडावें याचे भरी । तो शिरडी मधला भिकारी । तुकडे मागोन [illegible] ॥ १३० ॥ साध्वीचे चित्तीं तळमळ ।

परी लागलीसे प्रबळ । म्हणे कधीं अर्पीन भाळ । त्या महाराज पदीं मी ॥ १३१ ॥ पेणशे पुढें फिरत फिरत । आले शिरडी ग्रामांत । सवें कांता सद्गुणी शांत । नाम माई जियेचें ॥ १३२ ॥ पेणसे सरकारी कामीं गुंतले । तों साध्वीनें काय केलें । जावोनी आपुलें साधिलें । कार्य तेथवां दर्शनाचें ॥ १३३ ॥ सायी पदीं अर्पितां भाळ । निमाली मनाची तळमळ । समाधान झालें सकळ । कौतुकें सांगे पतीसी ॥ १३४ ॥ मीं गेलें दर्शनासी । तो खराच आहे पुण्यराशी । तुम्हीं नका निंदूं त्यासी । दर्शन घ्या हो साधूचें ॥ १३५ ॥ कांतेच्या आग्रहावरून । आले दर्शना कारण । तें महाराज बोलले गर्जोन । येऊं नका कोणी येथें ॥ १३६ ॥ धोंडा घेऊन हातीं । पुढें येतां मारीन म्हणती । मी आहें ढोंगी अती । माझें दर्शन घेऊं नका ॥ १३७ ॥ मी जातीनें आहें हीन । वेडा पिसा मुसलमान । तुम्हीं उच्चवर्णी ब्राह्मण । बाटाल दर्शन घेतांची ॥ १३८ ॥ ऐसें बोलतां तयासी । पेणसे विरघळले मानसीं । म्हणती हा असे ज्ञानराशी । त्रिकालज्ञ महाराज ॥ १३९ ॥ आम्हीं बोललों उभयतां । तें या कळलें तत्वतां । जैसी वाऱ्याची व्यापकता । तैसी यांच्या ज्ञानाची ॥ १४० पेणशांनीं विचार केला । लावून आपाचा वशीला । लाभ करूनी घेतला । सत्पुरुष दर्शनाचा ॥ १४१ ॥ यास लोटतां कांहीं दिन । काय घडलें वर्तमान । तें ऐका हो भाविकजन । श्रवणीं सादर बैसावें ॥ १४२ ॥ एके दिनीं सहजगती । महाराज बोलले अप्पाभती । आज चोरटे निश्चितीं । आले आपल्या गांवांत ॥ १४३ ॥ या चोरांची तऱ्हा निराळी । घराचा विक्षोभ न करिती मुळीं । ऐनमालावरी सगळी । दृष्टी असे तयांची ॥ १४४ ॥ तो करूनी हरण । जाती सर्व घेऊन । चोरी करीतां न दिसती जाण । ऐसे महा बिलंदर ॥ १४५ ॥ त्यांची प्रथमतः होईल स्वारी । आज वेड्या तुझ्याघरी । यास्तव जा कांहींतरी । बंदोबस्त करावा ॥ [illegible]

तार्थ या गोष्टीचा । अप्पासी न कळला साचा । पहारा बसवून भिल्लाचा । लौकिकी बंदोबस्त केला असे ॥ १४७ ॥ गल्लोगल्लीं फिरे गस्त । होतां एक प्रहर रात्र । जुलाब उलट्या अप्पाप्रत । होऊं लागल्या मरीच्या ॥ १४८ ॥ शरीर झालें अवघें गार । वांबें व्यापिलें पदकर । नासीक कळस साचार । झालासे वांकडा ॥ ४९ ॥ खोल-खोल डोळे गेले । नाड्यांनीं स्थान सोडिलें । लोक शोकाकुल झाले । पाहून स्थिति अप्पाची ॥ १५० ॥ कांता झाली घाबरी । पाहतां नवऱ्याची स्थिति खरी । धांवोन आली झडकरी । मशीदींत बाबांच्या ॥ १५१ ॥ महाराजांचे धरून पाय । रडूं लागली धाय धाय । बाबा माझा पतीराय । सोडूनियां चालला ॥ १५२ ॥ द्या हो उदी अंगारा । तेणें उतार पडेल जरा । सौभाग्य जहाज सागरा । नका बुडवूं महाराजा ॥ १५३ ॥ महाराज म्हणतो तियेशीं । नको करूं शोकासी जो जन्मला मृत्यू त्यासी । आहे येणार एके दिनीं ॥ १५४ ॥ मृत्यू जन्म ईश्वरी कला । तोच उरला भरून सगळा । करूं गेलिया तो वेगळा । कांहीं नये हाताशीं ॥ १५५ ॥ कोणी न जन्मे मरे कोणी । पहा परी ज्ञान चक्षूनीं । तूंही न निराळी त्या पासोनी । येईल हें प्रत्यया ॥ १५६ ॥ जैशी बंडी झालिया जीर्ण । लोक देताती फेकून। किंवा नावडे ह्मणून । त्याग करिती तियेचा ॥ १५७ ॥ तैसे हें शरीर वसन । पांघरलासे बाळे प्राण । तो प्राण नारायण । अक्षय अभग निर्विकल्प ॥ १५८ ॥ ह्मणून अंगारे करूं नको । उगीच ठिगळे मारूं नको । आड त्याच्या येऊं नको । जाऊं दे त्यास मुक्कामा ॥ १५९ ॥ माझ्या आधींच अप्पानीं । बदलावया आपुला कफनी । केली तयारी त्या लागुनी । तूं आड येऊं नको १६० ॥ अप्पास मिळेल सद्गती । मोक्ष आला त्याचे हातीं । चर्मचक्षूंच्या आड निश्चितीं । होताहे तो होऊं दे ॥ १६१ ॥ ऐसें निरखून तियेसी ।

वेळानें ॥ १६२ ॥ दुसरे दिवशीं गांवांत । दोन तीन लागले लोक सत्य । अवघे झाले भयाभीत । विनवूं लागले सायीसी ॥ १६३ ॥ बाबा पोत खेळूं लागली मरी । ह्याचा विचार कांहीं तरी । करा तुह्मीं आमच्या नगरीं । असून काय उपयोग ॥ १६४ ॥ महाराज म्हणती त्याप्रत । जातील माणसें सात । या आपुल्या शिरडींत । मग न राहे मरी ती ॥ १६५ ॥ बोलके तैसें झालें सत्य । मेलीं माणसें अवघीं सात । केवढें बाबांचें सामर्थ्य । आधींच भाकित केलें तिचें ॥ १६६ ॥ आतां ऐका पुढील प्रकार । तुम्हीं श्रोते उदार धीर । दास गणू मी तुमचें पोर । बोबडया शब्दें सांगतसें ॥ १६७ ॥ कोंडया सुतार नामें एक । भक्त होता परम भाविक । त्यावरी बाबांचें प्रेम देख । होतें आगळें सर्वांहूनी ॥ १६८ ॥ बाबा म्हणती कोंडयासी तुवां जावें खळवाडीसी । आग मधल्या गंजीसी । लागली ती विझवावया ॥ १६९ ॥ कोंडया झाला घाबरा । खळ्यास गेला करून त्वरा । तेथें तपास करून पुरा । आलासे माघारी ॥ १७० ॥ बाबा उगीच कांहीं तरी । सांगून मजला त्रास भारी । दिधला दुपारच्या अवसरीं । पाय माझे पोळले ॥ १७१ ॥ बाबा म्हणती ऐक जरा । माझी नोहे असत्य गिरा । वळून पाहे माघारा । तो पहा धूर निघाला ॥ १७२ ॥ सुडयांसी सुडया लागल्या दाट । मधल्या सुडीनें घेतला पेट । गांवांत झाला बोभाट । पेटलीसे खळवाडी ॥ १७३ ॥ दिवस होता उन्हाळ्याचा । त्यांत समय दुपारचा । प्रभंजन सुटला जोराचा । प्रळयवातासमान ॥ १७४ ॥ कडकडा झाडें मोडती । छपरें गगनीं उडूं पाहती । वावटळीस नाहीं गणती । दुर्धर प्रसंग ओढवला ॥१७५॥ लोक अवघे घाबरले । साईबाबाकडे आले । घट्ट तयांचे पाय धरिले । रडूं लागले दीनवत् ॥ १७६ ॥ हे साईबाबा कृपारासी । आग लागली खळवाडीसी । आतां आमची गति कैसी । सांगा होईल महा-

ती अवघी जळाल्या जाण । अन्न न मिळेल आम्हांतें ॥ १७८ ॥ मुलें माणसें मरतील जाण । करूनियां अन्न अन्न । गुरेंही सोडितील प्राण । चाऱ्यावांचून दयाळा ॥ १७९ ॥ यासाठीं कांहीं तरी । उपाय सांगा झडकरी ! तुम्ही साक्षात श्रीहरी । भूतभविष्य जाणते ॥ १८० ॥ त्या जनांच्या विनंतीसी । देऊनी मान पुण्यराशी । गेले त्वरें रखमासी । आग विझवाया कारणें ॥ १८१ ॥ गंजी जी होती पेटली । ती महाराजांनीं अवलोकिली । धार पाण्याची फिरविली । भोंवतालीं गंजीच्या ॥ १८२ ॥ ही एवढीच जळेल । दुसरीस न धक्का लागेल । हा अग्नीचा भाग सकळ । विझवूं नका कोणी इसी ॥ १८३ ॥ जैसें महाराज बोलले । तैसेंच पुढें प्रत्यया आलें । जन अवघे आनंदले । थोर महती बाबांची ॥१८४॥ अवघ्या गंजी शेजारच्या । रक्षण केल्या असती साच्या । अंमल आपुला अग्नीच्या । वरही ज्यांनीं चालविला ॥ १८५ ॥ सत्पुरुषांच्या आज्ञेंत । पंचभूतें वागती सत्य । सच्चिदानंद रमानाथ सेवे तिष्ठत जयांच्या ॥ १८६ ॥ अस्तमानाचे समयासी । मंडळी आली दर्शनासी । नानासाहेब पुण्यराशी । चिटणीस नगर जिल्ह्याचे ॥ १८७ ॥ चांदोरकर दर्शनास । गेले बाबांच्या मशीदीस । आपण होऊन तयास । महाराज बोलले तें ऐका ॥ १८८ ॥ हे माझे गुणनिधाना । गोविंदात्मज नारायणा । चांदोरकर कुलभूषणा । पहा हे लोक मतलबी ॥ १८९ ॥ आज या भागचंदाची । गंजी जळाली असे साची । पाठ पुरविली त्यानें आमुची । तोटा झाला म्हणोनी ॥ १९० ॥ लाभ हानी जन्ममरण । हें ईश्वराचे आधीन । परी हे कैसे अंधजन । विसरताती तयाला ॥ १९१ ॥ लाभ होतां आनंदावें । हानी होतां कां रडावें । माझें माझें म्हणावें अर्थ काय यांमध्यें ॥ १९२ ॥ गंजी कोठली मारवाड्यांची । ती मुळींच कडब्याची । उत्पत्ति ती तियेची । झालीसे

मेघांनीं । रवीनें अमृतकरांनीं । आणिलें त्या आकारा ॥ १९४ ॥ ऐसे याचे माळक तीन । पृथ्वी सूर्य सजळ घन । हा माझें माझें म्हणोन । उगाच टिऱ्या बडवितसे ॥ १९५ ॥ ती अग्नीनें भक्षिली । सूर्याची सत्ता अधिक झाली । पृथ्वी बिचारी होरपळली । मात्र अग्नितापानें ॥ १९६ ॥ मेघासी याची दाद नाहीं । तो घमेंडानंदन पाही । चंचळ सौदामिनी ठायीं । रममाण जाहला ॥ १९७ ॥ जे स्त्रियाशीं लंपट अती । असती । कीं मूढमती । ते कधीं ना जाणती । आपुल्या लाभ हानीतें ॥ १९८ ॥ तो त्यागुळें उगीच बसला । सूर्यानें कावा साधिला । भूमीपासूनी हिसकूनी नेला । माल आपुला म्हणोनी ॥ १९९ ॥ जगांत जितक्या वस्तु असती । त्यांची अशीच उत्पत्ती । मालक तियेचे निश्चितीं । नाहीं आपण सर्वदा ॥ २०० ॥ तूं तरी कांहीं सांग याला । हा उगीच करितो दुःखाला मघापासून त्रास दिला । यानें मला अनिवार ॥ २०१ ॥ एक्या हातीं ईश्वर देतो । सर्वेचि दुसऱ्या हातीं नेतो । प्राण सुखदुःखाकरण होतो । अज्ञान गांठीं म्हणोनियां ॥ २०२ ॥ जा शेटजी घरा स्वस्थ ॥ फायदा दुसऱ्या व्यापारांत । होईल तुमचा निश्चित । येईल नुकसान भरून हें ॥ २०३ ॥ ऐसा वर्षतां बोध घन । अवघे आनंदले पूर्ण । चिटणीसांनीं केलें वंदन । सद्गदीत जाहले ॥ २०४ ॥ हे भक्त चकोर पूर्ण चंद्रा । हे अपरोक्ष ज्ञानाच्या समुद्रा । द्यावी मसी ज्ञान मुद्रा । जेणें अज्ञान निरसेल ॥ २०५ ॥ देव कोण कैसा असे । तो कोठें वसतसे । काय केलिया भेटतसे । हें सांगा मजप्रती ॥२०६॥ जग हें मुळींच नश्वर । मग कां करावा हा व्यापार । ह्याचें वर्म फोडोनी सत्वर । मजलागीं सांगावें ॥ २०७ ॥ ऐसें ऐकतां चिटणीसाचें । भाषण बोलले महाराज साचें । विवेचन ह्या गोष्टीचें । करीन पुढें एके दिनीं ॥ २०८ ॥ जैसे चांदोरकर भक्त पुरे । तैसेच गणेश विष्णु बेरे । त्यांचें कथानक आतां । ...

॥ २०९ ॥ हे जिल्ह्याचे तपासणीदार । असती शेतकी खात्यावर । ते मुद्दाम शिरडीवर । आले दर्शन घ्यावया ॥ २१० ॥ बाबांचें करितां वंदन । बोलले ते त्यांकारण । तुम्हीं आतांच येथून । निघून जावें शीघ्रगती ॥ २११ ॥ वेळ थोडाहि करूं नका । क्षण एकही राहूं नका । भरधांव आपुला तांगा हांका । कोपरगांवा शीघ्र जावें ॥२१२॥ ठेवून विश्वास महाराज वचनीं । बेरे निघाले तेथोनी । त्यांच्या तांग्या मागोनी । येत होता दुसरा तांगा ॥ २१३ ॥ त्या दुसऱ्या तांग्यात । जे बसले होते गृहस्थ । ते बोलले बेऱ्यांप्रत । थांबा आम्हां येऊं द्या ॥ २१४ ॥ तांगा चालवा हळूहळू । नका हरिणासारखे पळु । अजून आहे बहुत वेळू । स्टेशनावरी गाडीस ॥ २१५ ॥ बेऱ्यानीं न त्या मान दिला । तांगा भरधांव हांकिला । गोदाप्रवाह ओलांडिला । पोहोंचले असती स्टेशनासी ॥ २१६ ॥ मागोमाग ऐकिली मात । लुटला तांगा रस्त्यांत । चोरट्यांनीं लवणांत । कोपरगांव रस्त्यावरी ॥ २१७ ॥ मारहाण फार झाली । संपत्ती अवघी लुटोनी नेली । पोलीस मंडळी निघाली । तपासासी तयाच्या ॥ २१८ ॥ हें ऐकता अशुभवृत्त । बेरे म्हणती हे सद्गुरुनाथ । संकटांतूनी या पोरांप्रत । तुम्हीं सत्य वांचविलें ॥ २१९ ॥ एक हिरण्यकेशी ब्राह्मण । वाशिष्टगोत्री ज्ञान संपन्न । जयाचें तें वसती स्थान । पुण्यपट्टण जाणा हो ॥ २२० ॥ तो असे थोर अधिकारी । श्रीमान सदय अंतरीं । निष्ठा ब्रह्मकर्मावरी । जयाची ती अत्यंत ॥ २२१ ॥ म्हणे घ्यावें धाराग्र । परी कांता पावती मरण । कांतेचिया वांचून । अग्निहोत्र कैसें घडे ॥ २२२ ॥ पोटीं नसे संतती । घरीं अगणित संपत्ती । लग्न कराया मेघे मती । पन्नासी भरली म्हणूनियां ॥२२३॥ त्यास म्हणती कित्येक जन । करा हो तुम्हीं दुसरें लग्न । प्रयत्नांतीं नारायण । पावतो ऐसें शास्त्र ॥ २२४ ॥ वागाईताची मनीं आस ।

॥ २२५ ॥ म्हणून आमुची प्रार्थना । साहेब आपण मनीं आणा । वधु पाहून सुलक्षणा । लग्न करून घ्यावें हो ॥ २२६ ॥ तैं ते म्हणती हरीपंत । आतां संततीची आस व्यर्थ । हांसू मात्र जगतांत । होईल लग्न करतांच ॥ २२७ ॥ वयास आली पन्नासी । म्हातारपणीं संततीसी । पाहीन ऐसा पुण्यराशी । मी नव्हें हो खचीत ॥ २२८॥ जरी एकादा सांगेल संत । मशीं लग्न करण्याप्रत । तरी लग्नाचा योग सत्य । घडून येईल निश्चयें ॥ २२९ ॥ ऐसें बोलून जनासी । हरीपंत आले शिरडीसी । जातां सायीदर्शनासी । बाबा बोलूं लागले ॥ २३० ॥ हरीबा तूं सभाग्य नर । लग्न करींरे सत्वर । पुत्र देईल शंकर । इच्छा पुरेल मनींची ॥ २३१ ॥ उगीच शंका न वाही मनीं । तुझा सर्वस्वें आहे ऋणी । भोलानाथ शूलपाणी । कर्पूरगौर परमात्मा ॥ २३२ ॥ तें ऐकतां जन हरिखले । म्हणती आतां बरें झालें । संतानुमोदन मिळालें । लग्न दुसरें करावया ॥ २३३ ॥ तरी म्हणती हरीपंत । ज्योतिषाचें पाहिजे मत । तें मिळाल्या निश्चीत । विवाह करीन दुसरा ॥ २३४ ॥ ऐसें बोलून नगरांत गेले । तो पुण्याहून पत्र आलें । कीं एक ज्योतिषी येथें भले । आले असती विद्वान ॥ २३५ ॥ एवंच मत ज्योतिषाचें । पडलें तेधवां अनुकूल साचें । लग्न झालें पंताचें । साईकृपेकरूनी ॥ २३६ ॥ ते स्त्रीपुरुष तरुच्यूत । साईकृपा हा वसंत । फल त्या वृक्षा येईल सत्य । शंका मुळींच घेणें नको ॥ २३७ ॥ जोंधळा आला पोटरींत । वरी पाऊस पडला बहुत । हवाही शुद्ध अत्यंत । मग कणसाची शंका कां ॥ २३८ ॥ त्या हरिपंत द्विजाची । निष्ठा सायीपदीं साची । योग्यता थोर बाबांची नमन माझें तयातें ॥ २३९ ॥ बाबा साई कृपाराशी । ज्ञाननभींचा पूर्ण शशी । चिंतामणी भाविकासी । चिंतिलें फळ देणार ॥ २४० ॥ नित्य स्मरतां त्या साईपदा । हरतील अवघ्या अपदा । सीताबेदरे

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] [ अंक ४.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| श्रीसद्गुरु साईनाथस्तवन ... ... ... ... | ९–१० |
| श्रीसमर्थ साईनाथमहाराज यांच्या लीला ... ... | १–१० |
| श्रीरामनवमीच्या हिशोबाचा खर्डा शके १८५३ ... | १–१० |
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | १–१० |
| केकावली–सूचिपत्र ... ... ... ... | १— ४ |
| अर्वाचीन-भक्तलीलामृत अध्याय ३१ वा श्रीसाईबाबासंबंधानें | १—८ |


# विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें लगबग १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

# श्रीसद्गुरु साईनाथस्तवन.

१

मम वासना पूर्ण करावी श्रीसद्गुरुनाथ साई।
वरदहस्त शिरीं ठेवूनि पूनित करा साई॥
भवभय मजला गांजितें आतां दूरीत करा साई।
त्वत्पदकमलीं आश्रय देउनी विनायका सांभाळी साई॥

२

सगुणरुपधारी श्री सद्गुरु साईनाथ महाराज।
पतितपावन नामें ऐकूनी आलों मी योगीराज॥
तारी आतां ब्रीद राखी मजकडे कृपाकटाक्षें पाही।
दास विनायक विनवितो आतां मुक्तिदेई साई

३

कृपा करील साई तरी भवनदी तरून जाईन।
साई साई म्हणतां वाचे मोद मना होई।
भक्तकाम कल्पद्रुम साई शिरीं अभयकरां ठेवी.
आप्पाजीसुत विनायक बोले मागणें हेंचि पायां।

४

तूंचि गुरु साई। तूंचि देव साई।
साईविण आतां। न जाणे मी कांहीं।
तूंचि विष्णु साई। तूंचि ब्रम्हा साई।
तूंचि खरोखर। महेश्वर साई।

अनाथा कारणें । अवतरलेत साई ।
किती जडजीवा । उद्धरलेत साई ।
संकटीं घालूनि । सन्मार्गी लाविला ।
सद्गुरुनाथ साई । विनायक शरण तुम्हांला ।

५

तळमळ निववीरे श्री साई कृपासिंधु ।
षड्रिपु कुळ माझें तोडी यांचा समंधु ।
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
झडकरी झड घाली सद्गुरु माय माझी ।

आणखी थोडे अनुभव पुढें देण्याचा विचार आहे.

श्री बाबांचा दास.

# श्री समर्थ सांईनाथ महाराज यांच्या लीला.

लेखकः—रा. रा. **नारायण पुरुषोत्तम अवस्थी**, पुणें.

इसवी सन १९१८ चा सप्टेंबर महिना. या वेळीं पुणें शहरीं इन्फ्ल्युएंझा साथीच्या बिमारीनें लोक त्रस्त झाले होते. पुण्याचे लोक प्राण-रक्षणाचे उपाय शोधून काढण्यास धडपडत होते.

माझे वडील होळकर राज्यांत कन्नोद गांवीं या वेळीं जज्ज होते. त्यांच्याकडे जाण्याचा आमचा विचार ठरला. जातां जातां अनायासें साधल्यास मालकांचें ( बाबांचें ) दर्शन घेऊन पुढें जावें असा विचार वारंवार मनांत घोळूं लागला; पण आमचे चुलते कडक स्वभावाचे असल्यामुळें त्यांच्यापुढें ही गोष्ट काढण्यास धैर्य होईना.

समाधानाची गोष्ट ही कीं, आमचे काका जितके कडक तितके प्रेमळ होते. असो. माझ्याबरोबर माझ्या दोन चुलत्या निघण्याचें ठरलें. त्यांनीं मजजवळ जातां जातां समर्थांचें दर्शन घेऊन पुढें चलण्याविषयीं आग्रह केला. त्या सुसंधीचा फायदा घेऊन मी चुलत्याची त्यांना परवानगी घेण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनीं ती मिळविलीही पण. या योगेंकरून मनास अत्यंत आनंद झाला व त्याप्रमाणें तयारीसही लागलों, चुलत्यानें दौंड-मनमाड मार्गानें हर्दाचीं टिकीटें काढण्यास सांगितलें. ( हर्दा येथून पाय वाटेनें कन्नोद चौतीस मैल आहे. )

सदरप्रमाणें आम्हीं तारीख २९-९-१८ रोजीं ( रविवारीं ) पुण्याहून सायंकाळीं पांचच्या गाडीनें निघालों. त्या दिवशीं गाडी १॥--२ तास उशीरां असून चिक्कार भरली होती. कोठेंही बसण्यास तर नव्हेच पण उभें राहाण्यासही जागा दिसेना. शेवटीं कसें बसें करून प्रत्येकजण वेगवेगळ्या ठिकाणीं घुसलों व साडेसहा सातच्या सुमारास पुणें सोडलें.

असो. ज्याअर्थी गाडी उशीरां आली त्या अर्थी दौंडास सायंकाळीं ८ च्या गाडीचें मिळणें चुकलें.

आम्ही रात्रौ १० वा. दौंडला पोहोंचून तेथून पहांटे निघणाऱ्या गाडींत जाऊन बसलों. पहांटे अडीच तीनच्या सुमारास एक तिकीट कलेक्टर आला व सदर डबा मिलिटरीकरितां ठेविला असल्यामुळें त्यानें आम्हांस तो रिकामा करण्यास सांगितलें. निरुपायनें पुन्हां प्लॅटफॉर्मवर उतरणें भाग पडलें. पाहातो तों दुसरीकडे जागा मिळेना.

निराशाजनक आवाजांत मी काकींना म्हणालों कीं " शिर्डीस जाण्याची आशा सोडा; कारण आपला मूळ प्रवासाचा वेळ असाच गाड्या चुकण्यांत जात असून आपल्यास रेल्वे नियमांप्रमाणें ज्यास्त वेळ मध्यें कोठें थांबण्यास मिळण्यास सवड नाहीं. "

वरील वाक्य उच्चारून एक क्षण न होतांच एक कलेक्टर ज्यानें आम्हांस खालीं उतरविलें होतें तो आला व त्यानें जागा केली आहे असें आम्हांस सांगितलें. हें ऐकून अत्यानंद झाला व आम्ही गाडींत बसून सोमवारीं एक वाजतां शिर्डीस सुखरूप पोहोचलों.

शिर्डीस पोहोचलों तेव्हां प्रथम श्री म. शि. काकासाहेब दिक्षितांचें दर्शन झालें. त्यांनीं आम्हांस वाड्यांतच उतरण्याचें सांगितलें व त्याप्रमाणें सोय लावून दिली. नंतर आम्हीं पूजासामुग्री घेउन समर्थांचें दर्शन घेण्यास मशिदींत गेलों.

त्या वेळीं बाबा साधरण कण्हत बसलेले होते व अंगांत ज्वरही होता. असो. त्यांचे चरणीं मस्तक ठेवून पुनीत व धन्य झालों. थोडा वेळ तेथें बसून त्यांची आज्ञा झाल्यावर वाड्यांत गेलों व फराळ वगैरे केला. थोडा वेळ विश्रांति घेऊन माडीवर (वाड्यांत) श्री. काकासाहेब दीक्षित,

क्षेम समाचाराच्या व इतर गोष्टी झाल्या. दुसरे दिवशीं म्हणजे मंगळवारीं सकाळीं जाण्याचा विचार प्रथम होता; कारण तिकीटें थेटची होतीं; परंतु त्या दिवशीं चावडी नसून मंगळवारी चावडी होती. तेव्हां रेल्वे नियमांची पर्वा न करतां राहाण्याचा विचार ठरला. असो. चहा वगैरे घेतल्यानंतर मागच्या खोलींत श्री. भ. मुक्तारामजींकडे गेलों. त्यापूर्वी त्यांचें व माझें संभाषण कधींच झालें नव्हतें. मात्र तोंडओळख होती. ह्या खेपेस मी दरवाज्यांत पाय ठेवल्याबरोबर "तूं या वेळीं आलास हें फार बरें झालें," असे त्यांनीं उद्गार काढले. अर्थात् मला त्याची कांहींच जाणीव होईना. पुन्हां सायंकाळचे वेळीं समर्थांकडे गेलों. आज त्यांची प्रकृति बरी दिसत नव्हती. तरी पण बसूनच होते. त्यांची लीला त्यांनाच ठाऊक.

दुसरे दिवशींही दिवसभर तेथेंच राहिलों; पण समर्थांच्या प्रकृती-वरून माझें मन उदासच होतें. त्याही दिवशीं प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें समर्थ चावडींत गेले नाहींत. दुसरे दिवशीं म्हणजे बुधवारीं प्रातःकाळीं निघण्याचा विचार ठरविला; पण लवकरच निघणें असल्यमुळें फक्त बेसनभात किंवा दशम्या करण्याचें काकीनें ठरविलें.

अरुणोदय होतांच शिवाच्या ओठ्यावर शौचमुखमार्जनास व स्नानास गेलों. स्नान आटोपून परत येते वेळीं वाटेंत दूध विकणारे भेटले. सहज भाव विचारतां तो पटला व एक शेर दूध घेण्याचें ठरलें. येथील माप माहित नसल्या मुळें दूध जरूरीपेक्षां पुष्कळ जास्त मिळालें; तेव्हां काकी खीर करतें म्हणाल्या व मी मग सामान आणून दिलें. काकीचा स्व-भावही दिलदार आहे. त्यांनीं खिरीबरोबर पुऱ्याही केल्या, व समर्थांस नैवेद्य पोंहोचता केला. कोठें बेसन दशमींचा विचार व कोठें खीर पुरी ! समर्थांची लीला समर्थांनाच माहित. नंतर आज्ञा आहे असें गृहीत धरून ( कारण प्रकृति बरीच बेचैन होती. ) श्री. काकासाहेबांया संमतीनुरूप [illegible] समर्थांचें दर्शन घेऊन टांग्यांत बसतेवेळीं [illegible]

मनांत आले. पहिला, आज बुधवार आहे "जाशीं बुधीं तर येशीं कधीं" ह्या म्हणीची आठवण झाली. कारण बुधवारीं निघाल्यास पुन्हां भेट होण्यास बराच काळ लागतो किंवा भेट होतच नाहीं, अशी समजूत कांहीं लोकांची आहे; परंतु तो विचार क्षणांत बदलून समर्थांकडे सर्वच दिवस सारखे असा ग्रह बनला. दुसरा विचार कन्नोद येथें गेल्यापासून आपण स्वतः समर्थांची पूजा दररोज करावी हा आला, व अशा प्रकारच्या विचारसरणींत सर्वांचा निरोप घेत भक्तमंडळाचें माहेर-घर ( शिर्डी ) सोडलें. कोपरगांवास सुखरूप पोहोंचून स्टेशन मास्तरास दोन दिवस येथें मुक्काम केल्याबद्दल सर्टिफिकिट देण्याची विनंति केली, पण त्यांनीं त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं. असो. तसेच गाडींत बसून मनमाडास गाडी बदलली. सायंकाळ झाल्यामुळें अंधारांत दिवे लावण्यापूर्वींच गाडींत बसलों. दिवे लावल्यावर सर्व डबा पंजाबी लष्करी लोकांनीं भरला होता. मन बरेंच घाबरलें, पण बाबांच्या कृपेनें हर्दा येथें गुरुवारीं प्रातःकाळीं पोहोंचलों. वाटेंत तिकीटांबद्दल व इतर कोणताच त्रास झाला नाहीं. पदो-पदीं समर्थांच्या अचाट शक्तीचे व लीलेचा अनुभव येत असतात.

हर्द्यास पोहोंचल्यावर तांगे करून मंडळीस नेमावरास रवाना केलें आणि मी श्रीसदुभैय्यांकडे सायकलवरून श्री बाबांच्या दर्शनास व त्यांच्या भेटीस गेलों. देवाचें दर्शन घेतलें व त्या दिवशीं सदुभैय्या कचेरींत होते तेथें त्यांस भेटून घाईघाईनें रवाना झालों. जवळ जवळ एक मैल गेलों असेन नसेन तोंच पंक्चर होऊन सायकलची हवा निघाली व समो-रचें ऊन असल्यामुळें स्वतःसही बराच त्रास झाला. निरुपायानें शहरांत परत येऊन सायकल पुनः दुरुस्त केली व एक नवीन टोपा ( Hat ) खरेदी केली. सामानांत ट्रंक वगैरे गेल्यामुळें पैशांकरतां पुनः श्री सदु-भैय्यांकडे गेलों; त्या वेळीं ते घरीं आले होते व फराळाचा वगैरे आग्रह केला. अर्थात् तासभर सहज निघून गेला. शिर्डीची सर्व हकीकत इत्थंभूत निवेदन केली व फराळ करून निघण्याच्या बेतांत असतांना श्री सदभैय्या

म्हणाले, "आम्हांस उदी नाहीं दिली?" लगेच खिशांतून उदी काढून दिली; तेव्हां ते म्हणाले, "याकरितांच तुम्हांस समर्थांनीं परत बोलावलें. नंतर निरोप घेऊन एक तासांत सानंदपूर्वक नेमावरास पोहोंचलों. तेथें गेल्यावर बिऱ्हाडीं सायकल ठेवून नर्मदेवर स्नानास गेलों. स्नान आटो-पल्यावर काय करावें या विचारांत क्षणभर नर्मदातिरीं उभा होतों तोंच नदींत थोडया अंतरावर असलेल्या मोहक व शुभ्र अशा फुलांवर नजर गेली व शिर्डीहून निघते वेळीं झालेल्या भावनांची आठवण झाली. नंतर फुलें तोडून बिऱ्हाडीं गेलों व बाबांची छबी काढून सानंदानें पूजा केली व दुसरे दिवशीं कन्नोदला पोहोंचलों व विचाराप्रमाणें दररोज पूजा कर-ण्यास प्रारंभ केला. ह्याप्रमाणें नित्य नेम चालू होता.

**नंतर १४ ऑक्टोबरला विजयादशमी होती** म्हणून श्री बाबांची छबी व गादी हौमेनें सजविणें शक्य होती तेवढी मी सजवली व पूजा थाटानें केली. १९१८ सालीं दोन दसरे झाले. कोठें सोमवारीं तर कोठें मंगळवारीं. इंदूर संस्थानांत पहिला पाळला गेला. दुसरे दिवशीं प्रति-ष्ठित (श्रेष्ठ) लोकांकडे "सोनें" देण्यास जाण्याचा प्रघात या संस्थानांत आहे. अर्थात्च आपणांकडे चार मंडळी आज येतील तेव्हां आजच्या दिवशीं देवाला सजवलें ही शोभा कायम ठेवावी असा विचार झाला, व त्याप्रमाणें केलेंही. त्या दिवशीं (ता. १५।१०।१८ पूजा थाटांत केली. ऐन आरतीच्या वेळीं गांवांतील बहुतेक लोक आले व वाजंत्रींही आले. या-प्रमाणें प्रथम दिवसापेक्षां जास्त उत्साहानें व समारभानें ही आरती झाली. सायंकाळीं एका गवयाचें गाणेंही देवासमोर झालें. बुधवारीं प्रातःकाळीं आरतीची तयारी करत असतांना थोडा आळस आला व आत्याबाईनें 'आज पूजा मी करत्यें' असें म्हणाली व मी कपडे घालून बाहेर गेलों.

बस्स याप्रमाणें त्या दिवसापासून पूजा मी स्वतः करणें बंद पडलें.

सुटल्याचा भास घरांतील प्रत्येक जणास आला. रात्रौ आमच्या वडिलांस व मातुःश्रीस बाबा केशरीभात मागतात, असें स्वप्नांत दिसलें व गुरुवारीं प्रातःकाळीं दोघांनीं आपला विचार ( स्वप्न ) एकमेकांस न सांगतां मातोः-श्रीनें केशरीभात केला.

रविवारीं प्रातःकाळीं हर्द्याहून श्री सदुभैय्यांचें पत्र आलें कीं, " श्री स. गु. बाबांनीं १५।१०।'८ रोजीं देह ठेविला.

वरील हकीकतींत समर्थांच्या शेवटच्या दिवसांचा स्पष्ट अनुभव आहे तो पाहा.

तिसरे दिवशीं साखर भात झाला त्याचें कारण त्या वेळचे तेथील पोस्टमास्टर रास्ते म्हणाले--बाबा जरी परब्रह्म होते तरी देह यवनाचा होता. सबब त्या लोकांच्या रीतिनुसार हा प्रकार घडला.

तदवत् बुधवारीं शिर्डी सोडणें, मंगळवारीं विशेष थाटानें पूजा होणें, बुधवार ता. १६--१०--१८ पासून पूजा बंद पडणें, वगैरे गोष्टी फार आश्चर्यकारक आहेत. तेच सर्व घडवितात.

२ कल्लोदास एकदा माझा चुलत बंधु चि. बाबु फार बिमार झाला. त्या वेळेचे डॉ. नायते यांचे उपचार चालू होते. शेवटीं डॉक्टर-साहेब व आम्हीं सर्वजण निराश झालों. बाबूचा प्राण अत्यंत कासावीस होऊं लागला व लौकरच अनिष्ट प्रकार घडणार, असें सर्वांस वाटलें. डॉक्टरसाहेबांचा जरी बाबांवर भरंवसा नव्हता. तरी ते बाबांच्या खोलींत गेले व फोटो हातांत घेऊन विचार करूं लागले कीं, " जर तुमच्या भक्ता-वर हा प्रसंग, तर आम्हीं तुम्हांवर विश्वास कसा ठेवावा ? "

सदर प्रकार एकीकडे घडत असतांच माझे वडील मोरींत तोंड धुण्यास गेले व त्या वेळीं त्यांच्या मनांत आलें कीं, "देवा वेळ कठीण दिसते, तुम्हांला उचित वाटेल तें करा. "

असो. वरील भावना दोघांच्या स्वतंत्र असल्यामुळें दोघे परत बिमाराकडे आले; पाहातात तों चि. बाबूस झोंप लागली होती. कांहीं वेळानें झोंप व आराम पडण्यास प्रारंभ झाला. दोघांनाही समर्थांच्या शक्तीचें आश्चर्य व कौतुक वाटलें; पण दोघेही त्या वेळीं स्वस्थ राहिले. प्रकृति साफ बरी झाल्यावर सत्यनारायण केला व डॉक्टरसाहेबांना व्यवहाररीत्या धन्यवाद दिले; तेव्हां डॉक्टरसाहेबांनीं व वडिलांनीं आपला अनुभव प्रगट केला व चि. बाबू बरा होण्याचें कारण "बाबांची कृपाच" असें सर्वांस खास वाटलें.

३ एकदा मी कांहीं कामानिमित्त मुंबईस गेलों. श्री. बाळासाहेब रेगे ह्यांच्या बिऱ्हाडीं गेलों; तेव्हां बाळासाहेब एक दिवसाकरितां शिर्डीस गेले होते व आठ दिवस होऊन गेले तरी परत आले नव्हते व त्यांचे वडील व मातुःश्री फार काळजींत होतीं. त्यांनीं मला शिर्डीस जाऊन बाळासाहेबांची हकीकत समक्ष जाऊन पाहाण्याकरितां शिर्डीस धाडलें। मी ज्या दिवशीं शिर्डीस पोहोंचलों त्या दिवशींच बाळासाहेब परत मुंबईस पोहोंचले. असो.

त्या खेपेस प्रथम बाबांनीं मजकडे दक्षिणा मागितली व एकदोन दिवसांचे आंत मजजवळील सर्व द्रव्य संपलें. मी ह्याखेपेस ४–५ रुपयांचें नाणें नेलें होतें. बाबा नाणें घेत नाहींत ही भावना होती; परंतु "आणखी कांहीं दे" म्हणाले. मी म्हणालों, "संपले." ते म्हणाले, "खिशांत काय आहे?" मी नाणें दाखविलें व त्यांनीं तें घेऊन हंसत हंसत खिशांत घातलें.

पुन्हां बाबांनीं १० रुपये मागितले. मी म्हणालों नाहींत. "बरें मुंबईहून पाठीव जा" म्हणाले. खरोखर ह्या खेपेस मुंबईस माझ्या पेटींत १० रु. च होते, ते त्यांनीं कसे अचुक ओळखले? त्यांची शक्ति तेच जाणों. असो. कोणाजवळ पैसे न मागतां थेट कोंपरगांवास तसेंच पायीं जावें, असा विचार केला. श्री काकासाहेब दीक्षितांनीं पैसे पाहिजेत का म्हणून

मजला विचारलें. परंतु 'पाहूं' असें मोघम उत्तर दिलें. इतक्यांत तांग्याचा आवाज ऐकला. आलेले गृहस्थ माझ्या परिचयाचे होते व विचारपूस करतांना ते पुण्याहून मुंबईस जात असतां मुद्दाम दर्शनाकरितां शिर्डीस आले होते. अर्थात्च समर्थांनींच त्यांची व माझी अकल्पित भेट घडविली व मी त्यांच्याबरोबर मुंबईस गेलों. आज्ञेप्रमाणें १० रु. मनिऑर्डरीनें पाठविले.

४ पुण्यास लष्करमध्यें श्री बाबा जान नांवाची एक विभुति आहे. सदर बाई बहुतेक बाबांना त्यांचा "भाऊ" म्हणतात. एकदां मी त्यांच्या दर्शनास गेलों होतों. त्यांना चहाची बरीच आवड दिसते. मी चहा आणूं का म्हणून विनंती केली. आज्ञा होतांच चहा बोलाविला. त्यांनीं सर्वांस चहा देण्यास सुरवात केली. एक जण म्हणाला, "बाबा! अभी तो लिया!" कारण नुकताच चहा झाला होता. त्यावर बाबाजान म्हणाल्या, "नहीं यह मेरे भाईके घरका है." अर्थातच मला त्यांच्या शक्तीचें आश्चर्य वाटलें; कारण तत्पूर्वी त्यांचा व माझा परिचय नव्हता.

एका दिपवाळींत मी पुण्यास लक्ष्मीपूजनाच्या पानसुपारीस गेलों होतों. अखेर जेथें पानसुपारी घेतली तेथें एक उत्तम फुलांचा गुच्छ मिळाला. तो श्री बाबांच्या छबीवर ठेवावा असा विचार झाला. परंतु नंतर बाबाजानकडे जाणें झालें. तो गुच्छ मी त्यांना समर्पण केला. "ये तो सीर पर पेनुंगी" असें म्हणाल्या. एकूण त्यांनीं ऐक्यरूपता दाखविली.

५. माझे वडील व मी एका वेळीं शिर्डीस गेलों असतांना परत येण्याच्यावेळीं कोपरगांवास गंगेस पूर होता, परंतु सपाटीवर पाणी थोडें असेल असें तांगेवाल्यास वाटलें. त्यानें तांगा तसाच पुलावरून चालविला. ऐन मध्यभागीं तांगा आल्यावर दोन्हीं बाजूंचे लोक व आम्हीं घाबरलों. कसेबसे बाहेर पडलों. सर्व लोकांस आश्चर्य वाटलें. आम्हांस बाबांच्या कृपेचें कौतुक वाटलें.

"समर्थाचिया लेंकरां वक्र पाहे,
असा भुवनत्रयीं कोण आहे?"

एकदा श्री. गणपतराव नरके आणि मी आळंदीस जाण्याचा विचार केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ६--७ वाजतां निघण्याचें ठरलें. सायकल-वरून जाणार होतों. मी आपल्या घरून वेळेवर रवाना झालों; पण मनांत साशंकपणा भरला. ट्रेनिंग कॉलजजवळ लांकडीपुलाकडे जाणाऱ्या मोठ्या रस्त्यास लागलों तों त्या सडकेवर बरेंच पाणी कमिटीनें घातलेलें होतें. दोन कुत्रीं भांडत भांडत माझ्या सायकलच्या मागील चाकास येऊन धडकलीं व मी एकदम सडकेवर खडीचा ढीग होता त्यावर पडून बेशुद्ध झालों. समोरील वाण्यानें मला उचलून आपल्या दुकानांत नेलें. डोक्यावर पाणी बरेंच घातल्यावर थोड्या वेळानें शुद्धीवर आलों. टांग्यांतून घरीं आलों. तरी मेंदूंत घड्याळाप्रमाणें आवाज होत होताच. श्री. गणपतराव माझ्या घरीं आले तेव्हां त्यांना हा प्रकार दिसला. ते तसेच आपल्या घरीं गेले व सायंकाळीं पुन्हां समाचारास आले. त्या वेळीं माझी प्रकृति बरी होती. नंतर श्री. गणपतरावांनी मला सांगितलें कीं, तेच दिवशीं पहांटे त्यांना असें स्वप्न पडलें होतें कीं, "ट्रेनिंग कॉलेजपासून ते सायकलवरून जात असतां त्यांच्या मागं कोणी एक भयानक पुरुष लागला, व त्यास पुला-पलीकडे गेल्यावर शिर्डीचा ( कोंडाजी ? ) मनुष्य आला व त्यानें त्या पुरुषास यथेच्छ चोप देऊन नाहींसा केला.

वरील माझ्या अपघाताशीं ह्या स्वप्नाचा संबंध त्यांनीं लाविला. मला मात्र हा अपघात अद्याप चांगला आठवत असून सायकलवर बसणें नकोसें वाटतें.

६. सन १९२४ च्या पुण्यतिथीस शिर्डीस जाण्याचा माझा विचार नव्हता; परंतु आदल्याच दिवशीं श्री साई लीलेचा अंक हातीं पडला व शिर्डीस जाण्याची उपरति झाली. सायंकाळीं ५ चे गाडीनें निघण्याची तयारी केली. दुपारीं ४ च्या सुमारास कुटुंबानें म्हटलें कीं, "मी अद्याप दर्श-नास गेलें नाहीं. मी येऊं कां ?" "हो" म्हणतांच तीही मुलासह निघाली. शिर्डीस पोहोंचलों तेव्हां श्रीच्या पादुकांवर अभिषेक चालू होता. आपणही

अभिषेक केला असता तर बरें, असें मनांत आलें; परंतु आधींच बराच वेळ झाला असल्याकारणानें चूप राहिलों.

सर्व आरती वगैरे झाल्यावर दुपारीं वाडयांत श्री. काकासाहेब दीक्षितांकडे बसलों होतों, तों काकासाहेब आपण होऊन बसलेल्या मंडळीस म्हणाले, "संस्थानचा असा नियम आहे कीं, समाधीवर १७ अभिषेक करावे आणि नंतर आलेल्या भक्तमंडळीपैकीं कोणी स्वइच्छेनें अभिषेकासंबंधीं दिल्यास तें त्या बाबीच्या खर्चास्तव जमा करणें." मी आनंदानें एका अभिषेकाची रक्कम दिली, आणि बाबांच्या अचाट शक्तीचें कौतुक वाटलें. मनांत आणलेली भावना त्यांनीं पूर्ण केली.

७. तसेंच १९२५ च्या गोकुळाष्टमीस कुटुंबानें देह ठेविला म्हणून तिची जी दर्शनाची इच्छा होती तीही सफल झाली.

श्रीशंकर

# श्रीरामनवमीच्या हिशोबाचा खर्डा.

चालू सालीं झालेला खर्च व आलेली जमा याचा तपशीलवार खर्डा या पोटीं आहे. यंदां नांदेड, मुखेड, उमरी, गऱ्हाण्ण, कलमजुरी, हिंगोली, खंदार, मुंबई, पुणें, अंधेरी, बांद्रा, खामगांव पंढरपूर, नगर, सांताक्रूझ, सोलापूर, पुणतांबें, नेवरगांव, वैजापूर, हरदा, इंडिया वगैरे ठिकाणांहून बरेच लोक आले होते. नेहमीं येणाऱ्यांपैकीं पापालाल हा आला नाहीं. त्यामुळें शोभेच्या दारूचे पैसे अंगावर पडले. सदरचा पापालाल हा आतां पुढच्या सालापासून येईल कीं नाहीं याबद्दल शंका आहे. उत्सवास आरंभ मिति चै० शु० ८ पासून झाला. पांच दिवसांत मिळून चारपांच हजार पान झालें. बाहेरगांवाहून यात्रेचे निमित्तानें सर्व प्रकारचीं मिळून शंभरसव्वाशें दुकानें आलीं होतीं. यात्रेंत सरकारचा पोलीस बंदोबस्त उत्तम होता. पांच दिवसांत मिळून जिलबी, साखरभात, शिरा अशीं पक्वान्नें झालीं; यांत एक दिवस भांडयाच्या अडचणीमुळें पक्वान्नांची थोडी कमतरता पडली. म्हणजे कल्हईचें भांडें एकच मिळाल्यामुळें त्यांतच पदार्थ शिजवून वाढावे लागले; यामुळें घोटाळा झाला. असो. गांवच्या मुसलमान लोकांना एक दिवस गोडभाताचें (पुलाव्याचें) जेवण दिलें. त्यांची मंडळी बायकापोरां-सुद्धां दोनअडीचशें झाली. कोठीचा बंदोबस्त नेहमीप्रमाणें श्रीमंत गोविंदराव महाजन, चीनैया मुकावार, गोविंद पानशोडीकर, मारुती पत्तेवार, मुरलीधर मामडे, रामचंद्र पत्तेवार वगैरे मंडळींनीं उत्तम तऱ्हेनें ठेविला होता. पंक्ति वाढण्याचा बंदोबस्त दिगंबरराव नांदेडकर, राजेश्वरराव नागोराव, रामराव मांजरमकर मास्तर वगैरे मंडळींनीं ठीक ठेवला होता. मुसलमानांच्या पंक्तीचा बंदोबस्त नागोबा वंजारी, बाबा, नारायण वगैरे लोकांनीं ठेविला होता. रामनवमीचे दिवशीं निशाणाची व रथाची मिरवणूक निघाली. तसेंच गांवच्या मुसलमान लोकांनीं हिंदूंचे रामनवमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ होणारे सर्व विधि झाल्यावर रात्रीं अकरा वाजतां मोठ्या समारंभानें सदरची मिरवणूक काढून महाराजांचे समाधीस चंदन चढविलें. अकोलेकर

अभिषे ...नीं दारू चांगली सोडली नाहीं. पैसे मात्र भरपूर घेतले. दारूकामाचा बंदोबस्त तात्या पाटील, बयाजी पाटील, रामचंद्र पाटील वगैरे मंडळींनीं उत्तम ठेवला. तसेंच हगाम्याचे खर्चाकरितां महाराजांचे समाधी-जवळील पेटींतील व मशिदींतील पेटींतील मिळून आलेले शंभर रुपये साडेबारा आणे तात्या पाटील कोते यांस दिले. व त्यांनीं गावांत वर्गणी करून हगामा साजरा केला. वर्गणी जमविण्याचें व पहीलवान लोकांस उत्तेजनादाखल बक्षीस देण्याचें काम तात्या गणपती पाटील, वामन पाटील, रामचंद्रदादा पाटील, बयाजी पाटील, व आणखी गांवच्या कांहीं मंडळींनीं मिळून उत्तम तऱ्हेनें केलें.

चालू उत्सवांत चंद्रभागाबाई मांजरमकर ही चारीकडे आंग धुण्यास व कपडे धुण्यास जात असतां, रस्त्यानें जाणारा एक घोडा बेफाम झाल्या-मुळें त्याच्या तडाख्यांत दुर्दैवानें चंद्रभागाबाई सांपडली. त्यामुळें तिचें नाक तुटलें, व कपाळावर व डोळयाखालीं अशा भयंकर जखमा झाल्या. तिला औषधोपचार करण्याकरितां तात्काळ स्पेशल मोटार करून कोपरगांव इस्पितळांत रवाना केलें. बरोबर श्रीमंत बापूराव राघोजी बोरावके, व्हाईस प्रेसिडेंट डि. लोकलबोर्ड हे गेले होते. त्यांनीं डॉक्टरना सर्व माहिती देऊन व डॉ. मराठे यांनींही चांगलें काम करून बाईस काळाच्या तडाख्यांतून सोडविलें. हें सर्व महाराजांच्या कृपेनें झालें. आतां बाई कोपरगांव इस्पि-तळांत चांगली हिंडूफिरूं लागली आहे. अजून कांहीं जखमा भरावयाच्या आहेत. त्याही आपल्या कृपेनें लवकरच भरतील. बाईच्या आप्तमंडळीस ही हकीकत कळविली, पण कोणीच आले नाहींत. सर्व व्यवस्था महाराजांच्या भक्तमंडळीनें लावली. यावरून संत हेच जगाचे आईबाप खरे आहेत. बाकीची मंडळी पैशाला वारस होऊं पाहाणारी आहेत. पौर्णिमेच्या दिवशीं सालाबादप्रमाणें महार, मांग, चांभार, भिल्ल, वडारी वगैरे मंडळीस गुळशिऱ्याचें भोजन दिलें. त्या दिवशीं स्वयंपाकी न मिळा-ल्यामुळें गांवचे पाटील दाजी शेळके यांनीं स्वयंपाक करण्याचें काम अंगावर घेऊन उत्तम तऱ्हेनें पार पाडलें. यांस रघु पाटील, बाबूराव नाना,